# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**श्रीक्षेत्र पंढरपूर (जि.सोलापूर) येथे स्वच्छतागृहांची उभारणी करणेबाबत**

**(१) ४०६५ (१५-०१-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीक्षेत्र पंढरपूर (जि.सोलापूर) येथे मोठया प्रमाणात पक्क्या स्वच्छतागृहांची तसेच सण - उत्सवांच्या काळात तात्पुरत्या स्वरुपातील स्वच्छतागृहांची उभारणी करणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वकिलांच्या समितीने कार्तिकी एकादशीच्या वेळी पंढरपूरमध्ये राहून केलेल्या तपासणीचा अहवाल न्यायालयाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी स्वच्छतागृहे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :-** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर ठिकाणी पुरेशी स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील असंघटीत कामगारांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळणेबाबत**

**(२) २८६०७ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर**

**शहर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संघटीत कामगारांच्या बरोबरीनेच असंघटीत कामगारांना दर्जेदार आरोग्य सेवा राज्य कामगार योजनेंतर्गत देण्यात येणार आहे यासाठी असंघटीत कामगारांना एकत्रित आणून ती माहिती संकलित करून केंद्राकडे पाठविण्यात येईल असे मा. मुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास जाहीर केले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असंघटीत कामगारांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली,

(३) असल्यास, तसेच राज्यातील असंघटीत कामगारांना माहिती संकलित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (१९-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांकरीता सन २००८ पासुन केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. ज्यामध्ये वर्षभरासाठी कुटूंबातील सर्व सदस्यासाठी मिळुन वैद्यकीय सुविधा दिली जाते. सन २०१३ अखेर या योजनेमध्ये ५२,७५,७८९ कुटुंबे नोंदीत झाली. त्यांच्या २,२२,५३६ आरोग्यसेवेच्या दाखल दाव्याद्वारे रक्कम रु. १,०७,९६,४०,१२२/- ची प्रतिपूर्ती त्यांच्या विविध विमा कंपन्यांमार्फत करण्यात आली सन २०१३ पासून राज्यात आरोग्य व कुटूंबकल्याण विभागामार्फत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना सुरु झाल्याने राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेची अंमलबजावणी बंद करण्यात आली आणि केंद्र शासनाच्या दिनांक १७.०३.२०१५ रोजीच्या आदेशानुसार या योजनेचे आरोग्य व कुटुंबकल्याण विभागाकडे हस्तांतरण करण्यात आलेले आहे.

(३) असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ अंतर्गत असंघटीत कामागारांना केंद्र शासनाच्या दिनांक १३.०४.२०१५ रोजीच्या कार्यकारी आदेशानुसार असंघटीत कामगार ओळख क्रमांक कार्ड (UWIN Card) देण्यात येणार असून त्याकरिता केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या सामाजिक, आर्थिक प्रवर्ग गणना डेटाबेस Socio Economic Caste Census (SECC) database चा वापर केला जाणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (ता.जि.सोलापूर) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा निधी पदनिर्मिती न केल्याने परत जाणार असल्याबाबत**

**(३) २९४२७ (२१-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (ता.जि.सोलापूर) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अडीच कोटी रुपयांचा निधी पदनिर्मिती न केल्याने परत जाणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये पी.पी.पी हा उपक्रम सुरु असून सदर उपक्रमास केंद्र शासनाकडून अडीच कोटी रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे व हा उपक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राबविण्यात येत असून उक्त तत्वानुसार काम करण्यात येत नसल्याने विदयार्थ्यातून नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) प्रश्नोक्त भाग (२) बाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करणे या योजनेंतर्गत रु. २.५० कोटी निधी बिनव्याजी कर्ज स्वरुपात सन २००७-०८ मध्ये औ.प्र.संस्था, मंगळवेढा या संस्थेस प्राप्त झालेला आहे. सदर योजनेंतर्गत प्राप्त निधीची परतफेड निधी प्राप्त झाल्यापासून १० वर्षानंतर पुढील २० वर्षात वार्षिक हफ्त्यांमध्ये केंद्र शासनास संस्था व्यवस्थापन समितीने करावयाची आहे. सदर योजना ३० वर्ष कालावधीची असल्याने सदर निधी परत जाण्याचा अथवा व्यपगत होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) हे खरे नाही.

पीपीपी योजनेबाबत केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार औद्योगिक आस्थापनांचे ५ प्रतिनिधी व शासनाचे ६ प्रतिनिधी अशी एकूण ११ प्रतिनिधीच्या संस्था व्यवस्थापन समितीमार्फत सदर योजना राबविण्यात येत आहे.

सदर योजनेबाबत विद्यार्थ्यांकडून कोणतीही नाराजी व्यक्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापने अधिनियमात सुधारणा करुन इतर भाषिक नामफलकापेक्षा दुकानावर मराठीतील फलक लावण्याबाबत

**(४) २९८२२ (२१-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापने अधिनियमात शासनाने २००० मध्ये सुधारणा करुन इतर भाषिक नामफलकापेक्षा दुकानावर मराठीतील फलक ठळकपणे लावणे बंधनकारक केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दुकानांवरील मराठी पाटयांच्या मुद्द्याबाबत कोणती भुमिका घेतली व त्यानुसार अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ अंतर्गत सद्यस्थितीत नोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन प्रणालीव्दारे दिले जात असल्याने नोंदणीच्या वेळी मालकाने दुकाने/आस्थापनेवर मराठी नामफलक लावण्याबाबत छायाचित्र सादर (अपलोड) केल्यानंतर सदर आस्थापनेची नोंदणी केली जाते.

दुकाने निरीक्षक हे आस्थापनेची उक्त अधिनियमांतर्गत तपासणी करतात. त्यावेळी दुकानावर नामफलक मराठी भाषेत ठळकपणे असल्याची खात्री करतात. नसल्यास, आस्थापना मालकांना तशी सूचना देण्यात येतात व सूचनांची पूर्तता न केल्यास त्यांचे विरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संकरा नेत्र रुग्णालयास ठाणे येथे नाममात्र शुल्कात भुखंड दिल्याबाबत

**(५) ३२३५६ (२१-०१-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॉरिशस सरकारसोबत मेडीकल टुरिझमचा व्यवसाय करणाऱ्या संकरा नेत्र रुग्णालयाला ठाणे महानगरपालिकेने ४ एकरचा भूखंड १ रु. या नाममात्र दराने देण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान महासभेत मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अंदाजे १५० कोटी किंमतीचा भूखंड १ रु. या नाममात्र दराने देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत.

(४) असल्यास, नियमांना बगल देवून घाईगडबडीत ठराव मंजूर करणाऱ्या व्यक्तींवर शासन कोणती कारवाई करणार आहे वा केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) संकरा नेत्र रुग्णालयासाठी अद्याप भूखंड अंतिम केलेला नसल्यामुळे त्याची किंमत काढण्यात आलेली नाही. तथापि, भूखंडाच्या किंमती ऐवजी खालील स्वरुपात सेवा देण्याची अट आहे.

अ) रुग्णालयामार्फत पुरविण्यात येणा-या एकूण रुग्णालयीन सेवा/शस्त्रक्रिया पैकी ४० टक्के सेवा या मोफत असाव्यात.

ब) महापालिका रुग्णालयात कार्यरत असणा-या डॉक्टर/नर्सेस यांना आवश्यकतेनुसार मोफत प्रशिक्षण पुरविणे.

क) महापालिकेतील वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचा-यांना मोफत सेवा पुरविणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिवाई ग्रामविकास प्रतिष्ठान संस्थेचा करार रद्द करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत

**(६) ३४८०८ (२१-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील उपवन तलाव निगा व सुशोभीकरण करण्यासाठी चार कोटीचा निधी मिळण्याबाबत तसेच करारनाम्यातील अट क्रमांक ३८ मध्ये नमूद शर्तीनुसार शिवाई ग्रामविकास प्रतिष्ठान संस्थेचा करार रद्द करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधी व रहिवाशांनी दिनांक १२ जुलै, २०१५ व दिनांक ३ ऑगस्ट २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यावरण मंत्री व आयुक्त ठाणे महानगरपालिका यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येते आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१६)** :(१) सन्मा. सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी दिनांक ०३.०८.२०१५ चे पत्रान्वये उपवन तलावाचा मे. शिवाई ग्राम विकास प्रतिष्ठान यांचा ठेका रद्द करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करणेबाबतचे निवेदन आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना दिले आहे.

तसेच सदर तलावाचे सुशोभिकरणासाठी व दुरुस्तीसाठी मा. पर्यावरण मंत्री यांनी २ कोटी देण्याची घोषणा केल्याचे व त्यानुसार तपशीलवार अहवाल राज्य शासनास सादर करण्याचे दिनांक ३०.०४.२०१५ चे पत्रान्वये ठाणे महानगरपालिकेस कळविले आहे.

(२) सन्मा. सदस्य. श्री प्रताप सरनाईक यांचे दिनांक ०३.०८.२०१५ व दिनांक ३०.०४.२०१५ चे पत्रास अनुसरुन ठाणे महानगरपालिकेद्वारे उपवन तलाव निगा व सुशोभिकरणकरिता, पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे पत्र क्र. ठामपा/प्रनिक/३४७, दिनांक २९.०९.२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला.

तसेच दिनांक ०४.०८.२०१५ रोजी तलावाच्या ठेकेदारास ठामपा/प्रनिक/२५३ अन्वये ठाणे महानगरपालिकेद्वारे नोटीस बजावण्यात आली व दिनांक ०६.०८.२०१५ रोजीच्या पत्र क्रमांक ठामपा/प्रनिक/२५८ अन्वये मे. शिवाई ग्राम विकास प्रतिष्ठान यांना तलावाच्या ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याकरिता कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका आयुक्त यांना ५० कोटीपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांची परिगणना करण्याचे आदेश दिल्याबाबत**

**(७) ३७०५४ (२१-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास ठाणे महानगरपालिका आयुक्त यांना ५० कोटीपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांची परिगणना करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा कोट्यधीश व्यापाऱ्यांच्या शोधाकरिता कोणती मोहिम सुरु केली आहे व या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत किती व्यापाऱ्यांचा शोध लावण्यात आला आहे,

(३) असल्यास, ही यादी विक्रीकर विभागाला देण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, या कोट्यावधीश व्यापाऱ्यांकडून एलबीटी वसूल करण्यात आला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

शासन अधिसूचना दिनांक १.८.२०१५ अन्वये सर्व महापालिकांना हे आदेश देण्यात आले आहेत.

(२) ५० कोटीपेक्षा जास्त खरेदी किंवा विक्रीची उलाढाल असलेल्या व्यापाराची यादी दिनांक ०६.०१.२०१६ रोजी ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झाली.

सदर यादीची पडताळणी दिनांक १५.०९.२०१५ अन्वये करण्यात येत असून सद्य:स्थितीत अशा ३७ व्यापारी आस्थापना आढळून आलेल्या आहेत.

(३) नाही.

(४) होय.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापुर महानगरपालिकेने खरेदी केलेल्या बसेस बाबत**

**(८) ३९७२९ (०५-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिका परिवहन विभागाने नुकत्याच खरेदी केलेल्या नवीन ७५ बसेस नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले असून या संदर्भात संबंधित कंपनीला प्रशासनाने ३९ पत्रे लिहिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नवीन बसेस खरेदीची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीसोबत झालेल्या करारानुसार बसेस खरेदी करतांना कोणते निकष ठरविण्यात आले होते, सदरच्या निकषानुसार या बसेस दुरुस्तीची जबाबदारी नाकारणाऱ्या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) दैनंदिन वाहतूक संचलनावेळी ज्यादिवशी तांत्रिक दोषामुळे बसेस नादुरुस्त होतील त्या-त्या दिवशी सदर दोष नमूद करुन कंपनीला पत्रे लिहिलेली आहेत.

(२) व (३) केंद्रशासनाने निश्चित केलेल्या UBS-II स्पेसिफिकेशन व करारातील तरतुदीनुसार बसेस खरेदीचे निकष ठरविण्यात आले होते. त्यानुसार बसेस मध्ये वेळोवेळी उद्भवणारे तांत्रिक दोष दुरुस्तीची जबाबदारी संबंधित कंपनीने नाकारलेली नाही.

कंपनीकडून त्या-त्यावेळी बसेसमधील तांत्रिक दोष दुरुस्त करुन दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कॉ.गोविंद पानसरे यांच्या संबंधात प्रत्यक्षदर्शी मुलासंदर्भात सनातन संस्थेने दिलेल्या धमकीच्या पत्राबाबत**

**(९) ४०२५८ (२०-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्ये प्रकरणी अटक करण्यात आलेल्या संशयीतास प्रत्यक्षदर्शी मुलाने ओळखल्याचे पोलीसांना सांगितल्याने सदर मुलासंदर्भात सनातन संस्थेने दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी कोल्हापूर पोलीसांना धमकीचे पत्र देवून खुले आव्हान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली तसेच दहशतीचा अवलंब करुन समाजाचे स्वास्थ बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या सनातन संस्थेवर बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही. कॉ.श्री.गोविंद पानसरे यांचे खुणाचे गुन्हयाच्या तपासामध्ये निष्पन्न असणारा साक्षीदार मुलास व या गुन्हयाच्या संबंधाने असणारे इतर साक्षीदार यांना उद्देशून सलमान खान प्रकरणातील रविंद्र पाटीलच्या मृत्युमुळे त्याची साक्ष रद्द ठरली. त्यामुळे पानसरे प्रकरणात न्याय होण्याच्या दृष्टीने आरोपपत्रात नमूद केलेल्या प्रत्येक साक्षीदाराची त्याच्या मृत्यूपूर्वी संपूर्ण साक्ष न्यायालयासमोर होणे अतिशय महत्त्वाचे आहे. अशा मजकुराचे पत्र प्राप्त झाले आहे. याबाबत प्राप्त तक्रारीनुसार शाहूपुरी पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा नोंद क्र.१९/२०१६ भा.द.वि.स. कलम ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) सनातन संस्था या संघटनेवर बेकायदेशीर कृत्ये करणारी संघटना म्हणून बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७ मधील परिशिष्टामध्ये समाविष्ट करण्याबाबत केंद्रीय गृह मंत्रालयास दिनांक ११.०४.२०११ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रेक्सिन कंपनीच्या पनवेल, तळोजा, खांदेश्वर आणि डायघर कार्यालयातील व्यवस्थापकांना मारहाण करण्यात आल्याबाबत

**(१०) ४०२६१ (१७-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा औद्योगिक वसाहतीतील रेक्सिन कंपनीच्या पनवेल, तळोजा, खांदेश्वर आणि डायघर कार्यालयातील व्यवस्थापकांना मारहाण केल्याप्रकरणी कंपनीने संबंधित पोलीस ठाण्यामध्ये, माहे डिसेंबर, २०१५ मध्ये तसेच त्यापूर्वीही वारंवार तक्रारी करुन संशयिताची नावे तळोजा पोलीसांना देवूनही पोलीसांनी दखल घेतली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारताचे पंतप्रधान, इंग्लड दौऱ्यावर असताना उद्योजक परिषदेत रेक्सिन कंपनीच्या अध्यक्षांनी सदर बाब मा.पंतप्रधानांच्या निदर्शनास आणून दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच राज्यातील बहुतेक औद्योगिक वसाहतीत असेच प्रकार होत असून कायदा व सुव्यवस्था हातात घेऊन दहशत निर्माण करण्यात येवून उद्योगांचे स्थलांतर होत असल्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.
(३) माहे डिसेंबर, २०१५ मध्ये तळोजा पोलीस ठाण्याचे हद्दीत असलेल्या रेक्सिन बेव्हरेज कँन (इंडिया) प्रा. लि. या कंपनीमध्ये व्यवस्थापनातील अधिका-यांना राजीनामा देण्याबाबत व

राजीनामा न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या तक्रारीवरुन तळोजी पोलीस ठाण्यामध्ये अदखलपात्र गुन्हा नोंद क्रमांक ५९८/१५ भादंवि कलम ५०७ प्रमाणे नोंद करण्यात आला असून तपास चालू आहे.

वरील घटनेपूर्वी रेक्सिन कंपनीचे व्यवस्थापनातील अधिका-यांनी दिलेल्या तक्रारीवरुन ५ दखलपात्र व ७ अदखलपात्र गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. रेक्सिन कंपनीच्या प्रत्येक तक्रारीची दखल पोलीसांनी वेळोवेळी घेतली आहे. तसेच रेक्सिन कंपनीने मागणीनुसार वेळोवेळी पोलीस मदत/ बंदोबस्त देण्यात आलेला आहे.

(४) दहशतीमुळे औद्योगिक वसाहतीमधील उद्योग धंदे बंद स्थलांतरीत झाल्याचा प्रकार निदर्शनास आलेला नाही. अशा प्रकारची तक्रार आल्यास त्वरित कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत**

**(११) ४१००७ (१७-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात रोज होणारा २०० टन कचरा कसबा बावडा येथील झूम प्रकल्पाच्या कचऱ्याच्या ढीगावरच साठविला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचरा व त्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न गंभीर बनत चालला असून आसपासच्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर झूम प्रकल्पातील मशिनरीवर सुमारे रु. ४० लाख खर्च करावा लागत असून, कच-यापासून वीज निर्मिती होण्याच्या प्रकल्पास सुमारे ३ वर्षांचा कालावधी बाकी आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६) :** (१) कोल्हापूर शहरात दररोज १८० मे.टन कचरा निर्माण होतो. कोल्हापूर महानगरपालिकेकडे कचरा विल्हेवाटीकरीता अन्यत्र जागा उपलब्ध नसलेने सध्या कसबा बावडा येथील झुम प्रकल्पावर साठविला जातो.

(२) कसबा बावडा येथील झुम प्रकल्पावर टाकण्यात येणा-या कच-यावर दुर्गंधी नाशक जैविक कल्चर तसेच किटकनाशक औषधांची नियमितपणे फवारणी करणेत येते. त्यामुळे परीसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) कोल्हापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये दैनंदिन निर्माण होणारे कच-याचे विल्हेवाटीकरीता कसबा बावडा येथील जागा वापरात ठेवणे आवश्यक आहे. याकरीता प्रकल्पावर मशिनरी भाडेने घेतलेली आहे.

तसेच कोल्हापूर महानगरपालिकेअंतर्गत घनकच-यावर प्रक्रीया करुन त्यापासून वीज निर्मिती करणेचा प्रकल्प उभारणीचे कामास सुरुवात करणेत आली आहे.

(४) टाकाळा येथील जागेमध्ये सायंटीफिक सॅनिटरी लँडफिलसाइट विकसीत करणेचे काम सुरु असून हे काम पूर्ण होताच कसबा बावडा प्रकल्पावर साचलेले सर्व इनट मटेरीयल टाकाळा येथील जागेमध्ये हलविणेत येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हातील सहा ग्रामपंचायतींना नगरपंचायतींचा दर्जा देऊन नगरपंचायतीची मान्यता देण्याबाबत**

**(१२) ४११०४ (०४-०५-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हातील कोरेगांव, वडूज, पाटण, दहीवडी, खंडाळा व मेढा या तालुक्याच्या ठिकाणच्या ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये करण्याचा अध्यादेश राज्य शासनाने माहे मार्च, २०१४ मध्ये काढला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या ग्रामम‍पंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये करताना हरकती मागविण्यात आल्या होत्या आणि सदरच्या हरकतीही देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरेगांव तालुका वगळता इतर तालुक्यांनी त्यांच्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यास आमची कोणतीही हरकत नाही असे राज्य शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०१४ मधील मार्च महिन्यात राज्य शासनाने सातारा जिल्हातील सहा तालुक्यांच्या ठिकाणच्या ग्रामपंचायतींचे नगरपंचायतीत रुपांतर करण्याचा अध्यादेश जारी केला असताना अद्याप का निर्णय घेतला नाही,
(५) अद्यापही राज्य शासनाने यासंर्भात कोणताही निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :** (१) व (२) होय खरे आहे.
(३) व (४) याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांचे स्तरावर हरकती सुचना मागविण्यात येऊन वडूज, पाटण, दहीवडी, खंडाळा, मेढा या ग्रामपंचायतींची नगरपालिकेमध्ये रुपांतर करण्याबाबतची अंतिम अधिसूचना दिनांक २४/०५/२०१६ रोजी निर्गमित केली आहे.
कोरेगांव ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याची अंतिम अधिसूचना दिनांक ०५/०३/२०१६ रोजीच निर्गमित केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील जगप्रसिध्द पाणचक्कीच्या हौदात मासे मृत्यूमुखी पडल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत**

**(१३) ४१२८४ (०५-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील जगप्रसिध्द पाणचक्कीच्या हौदात माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात मासे मृत्यूमुखी पडल्याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश सीईओने दिनांक ३ जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१६) :**(१) माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात पाणचक्की परिसरातील प्रवेश गेट समोरील असलेल्या मोठ्या पाण्याच्या हौदाच्या बाजुस असलेल्या चरामध्ये नहेर पाणचक्कीचे पुर्णपणे पाणी बंद झाल्याने सदरच्या चरामध्ये लहान लहान मांसे काही प्रमाणात मृत्यूमुखी झाल्याचे दिसून आले. चरामधील पाणी रिकामे करुन घेऊन स्वच्छ करुन घेतले होते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणांची चौकशी करण्यात आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड शहरात देगलूर नाका भागात असलेल्या हैदरबाग फंक्शन हॉलजवळ ड्रेनेज लाईन जोडत असतांना चेंबरमध्ये उतरलेल्या तरुण कामगारांचा श्वास गुदमरुन मृत्यू झाल्याबाबत**

**(१४) ४१३५९ (०५-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरात देगलूर नाका भागात असलेल्या हैदरबाग फंक्शन हॉलजवळ ड्रेनेज लाईन जोडत असतांना चेंबरमध्ये उतरलेल्या तरुण कामगारांचा श्वास गुदमरुन दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम सुरु असतांना कोणतीच सुरक्षिततेची खबरदारी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मृतांच्या कुटुंबियांना कोणती तातडीची आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) सदर कामाच्या निविदा अट क्र. ३७ नुसार कामगारांच्या सुरक्षेची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असल्यामुळे कंत्राटदाराने मृत कामगाराच्या कुटुंबियाना आर्थिक मदत दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुंबईतील झोपडपट्टीत राहणा-या रहिवाश्यांना इमारतीत रहाणा-या रहिवाश्यांप्रमाणे पाणी मिळणेबाबत**

**(१५) ४२०५३ (०५-०५-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टीत राहणाऱ्या प्रतिव्यक्तीस मुंबई महानगरपालिका फारच कमी प्रमाणात पाणीपुरवठा करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारतीतील रहिवाशांप्रमाणेच झोपडपट्टीत राहणाऱ्या रहिवाश्यांना प्रतिव्यक्ती १३५ लीटर पाणी देण्याची मागणी मा. लोकप्रतिनिधीं यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीवर शासनाने निर्णय घेऊन झोपडपट्टीत राहणाऱ्या रहिवाश्यांना प्रतिव्यक्ती १३५ लीटर पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) राष्ट्रीय मानकानुसार, शहरी भागात सामायिक नळखांबाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या ठिकाणी दरडोई ४० लीटर प्रतिदिन या प्रमाणात पाणीपुरवठा करण्याचे निर्देशित केले आहे.

तथापि, मुंबईतील झोपडपट्टीवासियांना महानगरपालिकेमार्फत सामयिक नळखांबाद्वारे प्रतिदिन प्रतिमाणसी ४५ लिटर पाणी पुरवठा करण्यात येतो.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत हे झोपडपट्टीधारक इमारतीमध्ये रहावयास गेल्यावर त्यांना महानगरपालिकेमार्फत प्रतिदिन प्रतिमाणसी १३५ लीटर पाणी पुरवठा करण्यात येतो.

सध्या शोषण टाकी असलेल्या इमारतींना महापालिकेमार्फत दरडोई १३५ लीटर प्रतिदिन प्रमाणे पाणीपुरवठा केला जात आहे.

---

**कांदिवली (मुंबई) पश्चिमेकडील पोयसर परिसरातील पाणी समस्या सोडविण्याबाबत**

**(१६) ४२३८८ (०३-०५-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (मुंबई) पश्चिमेकडील पोयसर परिसरात पाणी समस्या मोठयाप्रमाणात वाढली असल्यामुळे स्थानिक रहिवाशांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास आर दक्षिण पालिका विभागावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिसरातील पाणी समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिककेमार्फत पोयसर येथे २५० मी.मी व्यासाची जलवाहिनी कमलेश झा कंपाऊड ते ब्रदीयादव चाळ पर्यत विस्तारित करण्यात येऊन सदर परिसरात अस्तित्वात असलेल्या १५० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीस समांतर टाकून त्यास जोडण्यात आल्यामुळे तेथे पाणी पुरवठा सुरळीत झालेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई ऐरोली व कोपरखैरणे सेक्टर -१९ येथे पोलीस स्टेशन**
**बांधण्यासाठी भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१७) ४४१३३ (०७-०५-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई ऐरोली व कोपरखैरणे सेक्टर -१९ येथे पोलीस स्टेशन बांधण्यासाठी भूखंड उपलब्ध करुन देण्यात यावा व पोलीस स्टेशन बांधून देण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यवस्थापकीय संचालक सिडको यांना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१६) :**(१) व (२) निवेदन प्राप्त झालेले नाही.

तथापि, पोलीस स्टेशनच्या बांधकामासाठी सिडको महामंडळाच्या धोरणानुसार कोपरेखैरणे येथील सेक्टर २० व १० मध्ये अनुक्रमे १९८९.८ चौ.मी. व १२१.३ चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडाचे वाटप दि.५.३.२०१३ रोजी केले आहे. तसेच, ऐरोली सेक्टर ८ मध्ये ११९८.२ चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडाचे वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल शहरातील सन २०४५ सालच्या लोकसंख्येचा विचार करुन शहर पाणीपुरवठा योजना सक्षम करण्याबाबत**

**(१८) ४४६०४ (०७-०५-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल शहरातील २०४५ सालच्या लोकसंख्येचा विचार करुन शहर पाणीपुरवठा योजना सक्षम करण्याकरिता १५३ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडयाची तांत्रिक व्यवस्थापनाकडून छाननी होऊन मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय, असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकल्प केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, सदर प्रस्ताव अमृत योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आला असून त्याअंतर्गत खालील कामे प्रस्तावित आहेत.

अ) महाराष्ट्र जीवन प्राधिककरणाकडे २०.०० द.ल..लिटर प्रति दिनी प्रक्रीयाकृत पाणी आरक्षणा पोटी त्यांच्या नविन न्हावाशेवा पा.पु योजनेत आर्थिक सहभागपोटी रु. २६.१५ कोटीची तरतुद.

ब) पनवेल नगरपरिषद अंतर्गत प्रभागातील लोकसंख्या निहाय ५ उंच जलकुंभ तीन जमीनी लगत पाण्याच्या टाक्या व शहरातील भविष्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार करुन पाणी समान वितरण होण्याच्या दृष्टीने १०० ते ४०० मि.मी व्यासाच्या नवीन पाईपलाईन सुमारे ३९.११ कि.मी टाकणे व पंपिग मशिनरी इत्यादी.

(४) निविदा प्रक्रिया पूर्ण होताच कार्यादेश देण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) येथे उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी कोणतीही आरोग्य सुविधा पुरविण्यात न आल्याबाबत**

**(१९) ४४६५२ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) येथे उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी कोणतीही आरोग्य सुविधा पुरविण्यात न आल्याने कामगारांचे शोषण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वसाहतीतील कंपनी व्यवस्थापक व ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (१९-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही.

खालापूर तालुक्यात ८ औद्योगिक वसाहती असून तेथील कामगारांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी २५ कारखान्यांमध्ये व्यावसायिक आरोग्यकेंद्रांची व्यवस्था केलेली आहे. याशिवाय ११ कारखान्यांमध्ये रुग्णवाहिकेची सोय केलेली आहे. तसेच शासनाने रायगड जिल्ह्यासाठी १८ प्रमाणक शल्य चिकित्सकांची नेमणूक केली असून ४ प्राथमिक आरोग्यकेंद्रामार्फत आरोग्य सुविधा पुरविण्यात आलेली आहेत. सदर सुविधा उपलब्ध असल्यामुळे कामगारांचे शोषण झालेले नाही.
(२) व (३) सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, संचालनालय, रायगड यांच्या कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे. या चौकशीत असे आढळून आले की, खालापूर (जि.रायगड) येथे उभारणात आलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये पुरेशी आरोग्य सुविधा उपलब्ध केल्या आहेत. त्यामुळे व्यवस्थापनावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

### जालना जिल्हा कारागृहात मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(२०) ४७३४४ (१७-०५-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हा कारागृह उभारुन एक वर्ष पूर्ण झाले असूनही या कारागृहात वीज, पाणी, सीसीटिव्ही कॅमेरे यासह अनेक मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्हा कारागृहास सर्व सुविधा पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६)** :(१) जालना जिल्हा कारागृहात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा नाही हे खरे आहे.
(२) सी.सी.टी.व्ही. उभारणी करिता आवश्यक अनुदानाची मागणी मा.जिल्हाधिकारी जालना यांचेकडील नविन्यपूर्ण योजनेअंतर्गत करण्यात आलेली आहे.
(३) जालना जिल्हा कारागृहास सन २०१५-१६ या वर्षात वॉकीटॉकी सेट २ हॅन्ड मेटल डिटेक्टर पुरविण्यात आलेले आहे.

(४) वेळोवेळी उपलब्ध अनुदानातून आवश्यक सुरक्षा उपकरणे जालना जिल्हा कारागृहास उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नंदुरबार जिल्हयातील तळोदा नगरपरिषदेस घनकचरा साठविण्यासाठी पर्यायी जागा मिळणेबाबत**

**(२१) ४७६६९ (०५-०५-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्हयातील तळोदा नगरपरिषद सध्या ज्या जागेवर घनकचरा साठवित आहे त्या जागेच्या आजू-बाजूच्या परिसराचे प्रदूषणामुळे नागरीकरण ठप्प झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरातील रहिवाशांना घनकचऱ्याच्या प्रदूषणामुळे दुर्गंधीचा वास येत असून घनकचरा व्यवस्थापनासाठी मौजे चिनोदा व मौजे आमलाड शिवारातील जागा मिळणेबाबत जिल्हाधिकारी नंदुरबार यांना प्रस्ताव सादर केला होता. तथापि, वरील दोन्ही ग्रामपंचायतींना ठराव करुन सदर जागा देण्यास विरोध दर्शविल्यामूळे पर्यायी जागा शोधण्याबाबत सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(३) नसल्यास, तळोदा नगरपरिषदेने शासनाकडे पर्यायी जागेची मागणी केली आहे काय,पर्यायी जागा कोणती आहे व त्या जागेवर घनकचरा साठविण्यासाठी स्थलांतरण केव्हा होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१६) :** (१) तळोजा जि. नंदुरबार शहरातील कचरा नगरपरिषदेच्या मालकीच्या साठविण्यात येणाऱ्या ठिकाणानजीक रहिवासी वसाहती आहेत. त्यामुळे घनकचरा प्रदुषणामुळे नागरिकीकरण ठप्प झाल्याची बाब खरी नाही.
(२) मौजे चिनोदा शिवारात घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा मिळण्यासाठी पर्यायी शासकीय जागेकरिता नगरपरिषदेकडून प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि, नवागाव व आमलाड येथील जागा संबंधित ग्रामपंचायतींच्या ठरावानुसार देता येणार नाहीत व इतर ठिकाणी पर्यायी जागा निश्चित करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.
(३) तळोदा नगरपरिषदेने पर्यायी शासकीय जागा मिळण्याबाबत मागणी केलेली आहे. घनकचरा प्रकल्पासाठी पर्यायी जागा उपलब्ध झाल्यानंतर आवश्यकते नुसार घनकचरा प्रकल्प स्थंलातरीत करण्यात येणार आहे.

---

## राज्यातील सर्व जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षात झालेली गुंठेवारीची सुमारे अडीच लाख बांधकामे नियमित करण्याबाबत

**(२२) ४८६४७ (२०-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षात झालेली गुंठेवारीची सुमारे अडीच लाख बांधकामे नियमित करण्याबाबतचा निर्णय माहे डिसेंबर, २०१५ च्या दुस-या आठवड्यात घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी कधी करण्यात येणार आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :** (१), (२) व (३) नागरी भागातील अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्यासाठी शासनाने धोरण तयार करुन सदर धोरण मा.मंत्रिमंडळाच्या मंजूरीनंतर मा.उच्च न्यायालयात दिनांक ४.४.२०१६ रोजी सादर केले होते. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७.४.२०१६ रोजीच्या आदेशान्वये शासनाने तयार केलेले अनधिकृत इमारती नियमित करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यास अनुमती नाकारली आहे. मात्र शासनाच्या वतीने नवीन धोरण सादर करण्यास मुभा दिली आहे. त्यानुसार नवीन धोरण ठरविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिडकोतील अभियंता पदासाठी सॅप कोर्सची अट अनिवार्य केल्याबाबत

**(२३) ४८७३२ (१३-०५-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोतील अभियंता पदासाठी सॅप सारख्या महागड्या कोर्सची अट अनिवार्य केली असून या कोर्स करिता सुमारे ३ लाख ८० हजार रुपये शुल्क आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे मध्यमवर्गीय बेरोजगार अभियंत्यांना नोकरीपासून वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची अट रद्द करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर पदासाठीची भरती प्रक्रिया मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून सुरु आहे. अभियंता पदासाठी जानेवारी, २०१६ मधील भरतीमध्ये सॅप ही शैक्षणिक अर्हता

प्राप्त असलेले उमेदवार प्राप्त झाले नसल्याने सिडको ठराव क्र. ११६४०, दिनांक २६.५.२०१६ अन्वये व मा. मुंबई उच्च न्यालयाच्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून सिडकोने पुन्हा एकदा सहाय्यक अभियंता (स्थापत्य) पदासाठी जून, २०१६ मध्ये जाहिरात दिलेली आहे.

उक्त पदासाठी सॅप ही शैक्षणिक अर्हता पूर्ण नसलेला उमेदवाराही अर्ज करु शकतो. सदर उमेदवार परिक्षा पास होऊन त्या उमेदवाराची निवड झाल्यास त्या उमेदवारास एका वर्षाच्या आत ही शैक्षणिक अर्हता पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोकमान्य टिळक रुग्णालयाच्या (मुंबई) डॉक्टरांना पौष्टिक आहार पुरवण्याची निविदा विषबाधेचा आरोप असलेल्या कॅटरर्सला दिल्याबाबत**

**(२४) ४८७७१ (०५-०५-२०१६). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकमान्य टिळक रुग्णालयाच्या (मुंबई) डॉक्टरांना पौष्टिक आहार पुरवण्याचे कॉन्ट्रॅक्ट मे.अन्नपुर्णा कॅटरिंग सर्विसेस या विषबाधेचा आरोप असलेल्या कॅटरर्सला देण्याच्या निर्णयाला दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीने मान्यता दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे डॉक्टरांचे आरोग्य धोक्यात येणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकमान्य टिळक (सायन, मुंबई) रुग्णालयाच्या डॉक्टरांना पौष्टिक आहार पुरविणा-या कॅटरर्सची निविदा रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येत असलेला पौष्टीक आहार डॉक्टरांच्या आरोग्याच्या दृष्टीने उत्तम दर्जाचा असल्याने आजमितीपर्यत आरोग्याचा कोणताही प्रश्न निर्माण झालेला नाही.

(३) दिनांक १५ ऑगस्ट, २०१४ रोजी मे. अन्नपूर्णा कॅटरींग सर्व्हिसेस कंपनीने पुरविलेल्या पौष्टीक आहारातून डॉक्टरांना विषबाधा झालेला नसून, सदर विषबाधा कंत्राटदाराने स्वातंत्र्यदिनानिमित्त गोड पदार्थ म्हणून पौष्टीक आहारात समाविष्ट नसलेल्या परंतु वाटप केलेल्या तिरंगा बर्फीमुळे झाली होती.

सदर पौष्टीक आहाराचे व बर्फीचे नमुने फॉरेन्सीक लॅब व एफ. डी.ए. यांच्याकडे महानगरपालिकेमार्फत तपासणीसाठी पाठविले असता, सदर विषबाधा पौष्टीक आहारातून झालेली नसून तिरंगा बर्फीमुळे झाली असल्याचे फॉरेन्सीक लॅब व एफ. डी.ए. यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

सन २०१६-१८ या दोन वर्षाच्या कालावधीकरिता निवासी वैद्यकीय अधिकारी यांना पौष्टीक आहार देण्याकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर निविदा कार्यपध्दतीत मे. अन्नपूर्णा कॅटरींग सर्विसेस हे लघुत्तम निविदाकार असल्यामुळे त्यांना महानगरपालिकेमार्फत पुनश्च पौष्टीक आहार पुरविण्याचे कंत्राट देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरात सिडको, हुडको कडून शासकीय दरात मिळालेला भूखंड खाजगी विकासकांना व व्यावसायिकांना विकल्याबाबत

**(२५) ४८९४१ (०५-०५-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात सिडको, हुडको कडून शासकीय दरात भूखंड खरेदी करून भूखंड खाजगी विकासकांना व व्यावसायिकांना कोटी रूपयांचा मुल्यात विकण्यात येत असल्या प्रकरणी औरंगाबाद न्यायालयात सन २००४ मध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर न्यायालयाने सन २००४ साली रिकामे व १० टक्के बांधकाम असलेले सर्व भूखंड जप्त करण्याचे आदेश सिडको व हुडको प्रशासनाला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको व हुडकोने आतापर्यंत किती भूखंड जप्त केले आहे,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९०-०९-२०१६)** :(१), (२) व (३) सन २००४ ते २०१२ मध्ये सिडकोने दिलेल्या जाहिर सूचनेनुसार व मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने २१४ रिक्त भूखंडापैकी १७० भूखंडधारकांनी तसेच अंशत: बांधकाम असलेल्या ६५ पैकी ५ भूखंडधारकांनी विहित मूदतीत बांधकाम परमिशन/भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केले आहेत त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, आतापर्यंत रिक्त २१४ पैकी १८ व ६५ पैकी ०३ असे एकूण २१ भूखंड जत्प करण्यात आलेले आहेत. एकूण ९ प्रकरणे मा.न्यायालयात प्रलंबित आहेत तर १८ प्रकरणांमध्ये न्यायालयीन निर्देशानुसार बांधकाम परवानगीकरीता ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही अशा भूखंडधारकांना सिडकोमार्फत नोटीसी पाठविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण नगरपरिषद (जि.रत्नागिरी) हद्दीतील बहादूरशेख नाका येथील बेकायदेशीर झोपडयांमधील कुटुंबांना शासनाकडून देण्यात आलेल्या निवडणूक ओळखपत्र व रेशनकार्डबाबत**

**(२६) ४८९५७ (१७-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपरिषद (जि.रत्नागिरी) हद्दीतील बहादूरशेख नाका येथील औदयोगिक वसाहतीसाठी आरक्षित असलेल्या जागेमध्ये उभारण्यात आलेल्या २०० हून अधिक अनधिकृत झोपडयांवर दिनांक १३ जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास कारवाई करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झोपडयांमध्ये वास्तव्य करणारी कुटुंबे कर्नाटक व अन्य राज्यांतील होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रहिवाशांपैकी सुमारे ८० जणांकडे महाराष्ट्र शासनाचे निवडणूक ओळखपत्र आणि सुमारे ४५ जणांकडे रेशनकार्ड आढळून आले असून याबाबतची तक्रार स्थानिक प्रशासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार निवडणूक ओळखपत्र व रेशनकार्ड देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर ठिकाणी उभारण्यात आलेल्या अनधिकृत झोपडया काढून टाकण्यात आल्या आहेत

(२), (३) व (४)

याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासन पुरस्कृत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम आरसी एच फेज-२ (एन.आर.एच.एम) योजनेंतर्गत ८६ पदे निर्माण करणेबाबत**

**(२७) ४९४११ (१३-०५-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेत केंद्र शासन पुरस्कृत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम आरसी एच फेज - २ (एन.आर.एच.एम) योजनेंतर्गत ८६ पदे निर्माण करणे व सध्याच्या २९ पदांना महानगरपालिकेच्या सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणेसंबंधी वसई विरार शहराच्या महापौर तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदन दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील सर्वसाधारण मागण्या काय आहेत, तद्नुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१६) :**(१), (२) व (३) मा.लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदन दिले आहे किंवा कसे, याबाबतची माहिती महानगरपालिकेकडे नाही.

तथापि, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत ८६ पदांचे निर्मितीचा प्रस्ताव व महानगरपालिकेने विहित पध्दतीने नियुक्त केलेल्या सध्याच्या कार्यरत २९ कर्मचा-यांना महानगरपालिका आस्थापनेवर सामावून घेण्यास शासन मान्यता मिळावी, यासाठीचा प्रस्ताव दि. ११ फेब्रुवारी, २०१५ रोजी शासनास पाठविण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या प्रस्तावावर शासनाने अधिक माहिती मागविली होती. सदर माहिती दि.११ फेब्रवारी, २०१६ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आली आहे.

---

**नांदेड शहरात बसवण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याबाबत**

**(२८) ४९८०० (०५-०५-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहरात सेफसिटी योजनेअंतर्गत बसवण्यात आलेल्या १०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी केवळ १७ कॅमेरे चालू असून ७३ सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार सीसीटीव्ही कॅमेरे चालू करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

नांदेड वाघाळा शहरात सेफसिटी योजनेअंतर्गत बसवावयाच्या १०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी ३ सीसीटीव्ही कॅमेरे पोलीस विभागाच्या सुचनेनुसार stand by ठेवून उर्वरित ९७ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी २३ कॅमेरे चालू असल्याचे व ७४ सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून तांत्रिक बाबीमुळे कॅमेरे बंद असल्याचे आढळून आले आहे. त्यानुषंगाने नवीन OFC केबलचे काम पूर्ण झाल्यानंतर बंद कॅमेरे पुर्ववत चालु करण्यात येणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ६५ नगरपंचायतींवर अधिकारी / कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत**

**(२९) ४९९२५ (०७-०५-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नव्याने अस्तित्वात आलेल्या ६५ नगरपंचायतींमधील निवडणुका पार पडून नगराध्यक्षही निवडण्यात आला मात्र अद्यापपर्यंत अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक झाली नसल्याने नागरिकांना वेगवेगळया समस्यांना तोंड द्यावे लागत असून विकासकामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ६५ नगरपंचायतींवर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही. शासन निर्णय, नगर विकास विभाग, दि.०५.०७.२०१६ अन्वये नवनिर्मित १०१ नगर परिषद/नगर पंचायतीमधील पदांचा आकृतीबंध मजूर करण्यात आला असून पदांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच सर्व विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन पदभरतीची कार्यवाही एका महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने चार हजार कोटी रुपयांचा लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत सादर न केल्याबाबत**

**(३०) ५०४४३ (१६-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने चार हजार कोटी रुपयांचा लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत विधिमंडळाला सादर केलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर मंडळाकडे विकासकांकडून उपकरापोटी जमा केलेले कोट्यावधी रुपयांचे धनादेश बाउन्स होवूनही मंडळाकडून विकासकांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (३०-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) महाराष्ट इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम १८ (१) अनुसार राज्य शासनाने सन २००७ मध्ये मंडळाची स्थापना केली. तथापि, दिनांक १ मे, २०११ रोजी प्रथमत: परिपूर्ण अशा त्रिपक्षीय संतुलित मंडळ गठीत करण्यात आले सन २००७ ते २०११ या कालावधीत कल्याणकारी योजना कार्यान्वित नसल्यामुळे प्रत्यक्ष खर्च झालेला नव्हता, मात्र मंडळाला उपकर प्राप्त होत होता.

सन २००७-०८ पासून सन २०१०-११ पर्यत मंडळाच्या कल्याणकारी योजनांवर खर्च केला गेला नसल्यामुळे डाटा एन्ट्री तसेच अकाउन्टींग/ऑडीटचे कामकाज झालेले नव्हते.

तसेच, मंडळास मंजूर असलेल्या पदांची भरती झालेली नसल्यामुळे मंडळाचे वार्षिक अहवाल व लेख विहित मुदतीत विधिमंडळासमोर सादर करण्यासाठी तयार करणे शक्य झालेले नाही.

आता सन २००७-०८ ते २०१०-११ पर्यत लेखी बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत तयार करण्यात आले असून त्याबाबतचे लेखापरीक्षण देखील पूर्णत्वास आले आहे. तसेच, सन २०११-१२ चे वार्षिक लेखे बाह्यस्त्रोत लेखापालाकडून पूर्ण करुन घेण्यात आले आहेत. तसेच सन २०१२-१३ पासून सन २०१४-१५ पर्यतचे वार्षिक लेखे तयार करण्यासाठी मंडळामार्फत बाह्यस्त्रोत लेखापालाची नियुक्ती करण्यात आली आहे.

लेखापरीक्षकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर वार्षिक अहवाल व लेखा परीक्षण अहवाल विधिमंडळापुढे सादर करण्यात येईल.

मंडळाकडे विविध प्रधिकरणे/विकासक यांच्याकडून ११६१ प्रकरणामध्ये रु. १७.५९ कोटी रक्कम धनादेशाद्वारे मंडळाच्या बँक खात्यामध्ये उपकरापोटी पाठविण्यात आली होती. परंतु, सदरचे धनादेश वटले गेले नव्हते. तद्नंतर मंडळाने पाठपुरावा करुन उक्त रकमपैकी ६ कोटी, २६ लाख, ७७ हजार ४९० इतक्या रकमेची वसुली केली असून उर्वरित रक्कम वसूल करण्याची कार्यवाही मंडळ स्तरावरुन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील अपघाताला कारण ठरणाऱ्या वाहतूकीला शिस्त लावण्याबाबत**

**(३१) ५२२५० (१६-०५-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील वाढते अपघात लक्षात घेवून तीन साडेतीन वर्षापासून अवजड वाहनांना शहरात काही काळासाठी बंदी घालण्यात आली असूनही पोलीसांना चुकवून काही जड वाहने शहरात ये जा करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्केट यार्ड परिसरातून एका दिवसात ये जा करणारे सुमारे पाच हजार ट्रक जड वाहतूक नियमांचे पालन करित नसून उक्त ठिकाणी रस्ते खराब झाले असून सूचना फलकही नसल्यामुळे नवीन अक्कलकोट नाक्याजवळ एका तरुणाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपघाताला कारण ठरणाऱ्या वाहतूकीला शिस्त लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :**(१) दि.२०.३.२०१३ रोजीपासून सोलापूर शहरामध्ये अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. अवजड वाहनांनी शहरात प्रवेश केल्यास त्यांच्यावर भा.दं.वि.सं. कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येते सन २०१५ मध्ये ४७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) दि.१९.४.२०१६ रोजी नवीन अक्कलकोट नाक्याजवळ मोटार सायकल व सायकल यांचा अपघात झाला असून या अपघातामध्ये सदर तरुण गंभीर जखमी झाला होता.
(३) सोलापुर शहरामध्ये अपघात होऊ नये याकरीता प्रमुख चौकामध्ये सिग्नल बसविण्यात आले आहेत. तसेच वाहतूक नियोजनाकरिता एकेरी मार्ग व सम-विषम पार्किंग करण्यात आली आहे. वाहतूक नियमांबाबत विद्यार्थ्यांचे शाळेमध्ये जाऊन प्रबोधन करण्यात येते. रस्ता सुरक्षा अभियानादरम्यान शहरात वाहतुक नियमांबाबत जनजागृती केली जाते. तसेच, वाहतुक नियमांचे उल्लंघन करणा-या वाहनचालकांविरुध्द सन २०१५ मध्ये १,०२,९२४ केसेस करण्यात आल्या असून त्यांच्याकडून रु. १३८६२१०० एवढा दंड वसूल केला आहे. तर सन २०१६ जून अखेर ४१,२१९ केसेस करण्यात आल्या असून कसुरदार वाहनचालकांकडून रु. १०,२४,१०० एवढा दंड वसुल केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड शहरातील श्रीवस्तीनगर येथे महानगरपालिकेने बीएसयुपी योजनेतून बांधलेली घरे गेल्या दोन ते तीन वर्षापासून बेवारस पडून असल्याबाबत**

**(३२) ५२७१४ (१७-०५-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहरातील श्रीवस्तीनगर येथे महानगरपालिकेने बीएसयुपी योजनेतून बांधलेली जवळपास ३५० घरे गेल्या दोन ते तीन वर्षापासून बेवारस पडून असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त इमारतीमधील सदनिकांचे वाटप लाभार्थ्यांना अद्यापपर्यंत करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या इमारती विनावापर पडून असल्याने शासनाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१६) :**(१) व (२) हे अंशतः खरे आहे.

श्रीवस्तीनगर येथील डीपीमध्ये आरक्षित जागेवर एकूण ८७७ घरकुलांचे बांधकाम करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार स्लाईस क्र. १ मध्ये २८८ व स्लाईस क्र. २ मधील १९२ अशी एकूण ४८० घरकुलांचे वाटप, शहरातील विकास कामात बाधीत होऊन बेघर झालेल्या लाभार्थींना करण्यात आले आहे. स्लाईस क्र.३ मधील ३९७ घरकुले, विकास कामात बाधीत लाभार्थी निश्चित होतील. त्यानुसार शिल्लक घरकुलांचे वाटप करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत चालू आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदरील घरे शहरातील विकास कामात बाधीत होऊन बेघर होणा-या मालमत्ताधारकांना वाटप करण्यासाठी बांधण्यात आलेली असल्याने विकास कामात बाधीत मालमत्ताधारक निश्चित करुन तसे घरकुलांचे वाटप करण्याचे प्रयोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील वडगाव शेरी येथील वाहतूकीच्या समस्याबाबत**

**(३३) ५२७४७ (२८-०४-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वडगाव शेरी येथे वाहतूक समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील वाहन संख्येत झपाट्याने वाढ होत असून त्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याने वाहन अपघातांची संख्या वाढत आहे असे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पुणे शहरातील वडगाव शेरी मधील वाहतूक समस्यांवर नियंत्रण आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

वडगाव शेरी परिसरामध्ये सन २०१५ मध्ये २ अपघात झाले असून एप्रिल, २०१६ अखेरपर्यंत एकही अपघात झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) वडगाव शेरी परिसरातील वाहतुक सुरळीत ठेवण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

अ) पुणे नगर रोडवर वडगाव शेरी जंक्शन ते विमाननगर चौकापर्यंत रस्त्यांच्या दोन्ही बाजूस नो-पार्किंग करण्यात आले आहे.

ब) या परिसरातील सिग्नल्सची वेळ सेट करण्यात आली आहे.

क) पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून पेट्रोलिंग करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मालाड पूर्व येथील टाईम्स ऑफ इंडिया प्रेस जवळील अनधिकृतरित्या पार्किंग केलेली जुनी वाहने हटविण्याबाबत

**(३४) ५३०५३ (२४-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड पूर्व येथील टाईम्स ऑफ इंडिया प्रेस जवळील रहेजा कॉम्प्लेक्स या परिसरात रस्त्यांच्या दोन्ही बाजूला अनेक वर्षापासून पडून असलेली जुनी व जीर्ण झालेली वाहने अनधिकृतरित्या पार्किग केलेले असल्याने ते हटविण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी यांनी वारंवार पोलिसांकडे तक्रारीच्या स्वरुपात करुनही सदर वाहने अद्यापही हटविण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) वाहतुक विभागास तक्रार प्राप्त झाल्यानंतर नमूद ठिकाणी असलेल्या ९ मोटार सायकली व १ मोटार वाहन खाजगी क्रेनच्या सहाय्याने हटविण्यात आले आहेत. तसेच, ४ मोटार वाहन जास्त प्रमाणात जीर्ण अवस्थेत असल्याने आणि हटविणे शक्य नसल्याने त्याबाबत महानगरपालिका कार्यालयास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दित रिलायंस ४ जी टॉवर उभारणीसाठी आयुक्तांनी नियमबाहय परवानगी दिली असल्याबाबत

**(३५) ५३२०८ (१९-०५-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दित रिलायंस ४ जी चे भूमिगत केबल लाईन टाकण्याचे काम तसेच सदरील कंपनीचे मोबाईल टॉवर उभे करण्याचे काम विना परवाना चालू केल्याबाबत चौकशी समिती नेमली असून, त्या समितीचा मंजूरी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय मनपा प्रशासनाने काम सुरु करु नये असा ठराव पारित केला असतांनाही तसेच मोबाईल

टॉवर उभारणीसाठी मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार राज्यशासनाने दिनांक ४ मार्च, २०१४ रोजी एक वेगळी उपविधी केली असून, त्या उपविधीचा वापर न करता आयुक्तांनी बांधकाम उपविधी मधील नियमांतर्गत नियम ३२ (१) (इ) चा वापर करुन त्यांच्या विशेष अधिकारात रिलायंस कंपनीच्या २६ मोबाईल टॉवरला परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास दिनांक ४ मार्च, २०१४ चे राजपत्रात नमूद केलेल्या २१ प्रकारच्या अटी व शर्तीची पुर्तता न करता परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: हे खरे आहे.

एकूण २६ प्रकरणापैकी ११ प्रकरणात दि. ४ मार्च, २०१४ च्या राजपत्रात नमूद केलेल्या २१ प्रकारच्या अटींची पुर्तता करण्यात आली आहे. उर्वरित दहा प्रकरणात एक अटीची पुर्तता झाली नाही. पाच प्रकरणात दोन अटींची पुर्तता झालेली नाही. पुर्तता नसलेल्या प्रकरणात विकास नियंत्रण नियमावेलीमधील कलम ३२ (१) (e) नूसार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या अधिकाराअंतर्गत परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) शासनाच्या दिनांक १३/६/२०१६ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई धारावीतील ५९ हजार झोपडयांच्या पुनर्विकासाबाबत**

**(३६) ५४३५९ (२९-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई धारावीतील विस्तीर्ण अशा १८३ हेक्टर जागेत चार सेक्टरमध्ये उभ्या असलेल्या ५९ हजार झोपडयांचा पुनर्विकास करुन तेथील रहिवाश्यांना चांगली घरे देण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार उक्त प्रकल्पातील कामे कोणकोणत्या विकासकांना देण्यात येणार आहे व त्याकरिता कोणत्या अटी व शर्ती विकासकांना घालून देण्यात येणार आहे,

(३) तसेच सदर प्रकल्प किती कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०७-१०-२०१६) :**(१) (२) व (३) धारावी पुनर्वसन प्रकल्पाद्वारे धारावी अधिसूचित क्षेत्रातील सेक्टर १ ते ४ च्या पुनर्विकासाकरिता जागतिक स्तरावर जाहिरात देवून दि. ३०.०१.२०१६ पासून सुरू केलेल्या निविदा प्रक्रियेला पाच वेळा मुदतवाढ देऊनही प्रतिसाद मिळू शकलेला नाही. सबब, निविदा प्रक्रिया व्यपगत क्षेत्राचा पुनर्विकास होण्याच्या अनुषंगाने इतर पर्यायांचा विचार सुरू आहे.

---

**चिखली नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेतील वाढीव अनुदानाचे वाटप करणेबाबत**

**(३७) ५५२६६ (२६-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेतील वाढीव अनुदानाच्या टप्प्याचे त्वरीत वाटप करा तसेच भौतिक सुविधांची कामे त्वरीत सुरु करा अशी मागणी होत असल्याचे माहे जून, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) सदर घरकुल योजना लाभार्थ्यांमार्फत राबविण्यात येत असल्याने लाभार्थ्यांच्या कागद पत्रांची छाननी तसेच त्यांच्या खात्याच्या पासबुकची आणि व्हाऊचरची तपासणी करण्याकामी कालावधी लागला आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार अकोला यांच्यामार्फत लाभार्थ्यांचा वाढीव अनुदानाचा प्रस्ताव तपासून जून महिन्यापासून वाढीव अनुदान वाटपास नगर परिषदेने सुरुवात केलेली आहे.

---

**राज्यातील स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारसांचे विविध प्रलंबित प्रश्नांबाबत**

**(३८) ५५५७५ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारसांचे विविध प्रलंबित प्रश्नांबाबत कोल्हापुर जिल्हा स्वातंत्र्य सैनिक संघटना यांनी मा. मुख्यमंत्री यांना विविध मागण्यांचे निवेदन माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वातंत्र्य सैनिकांची ना मंजुर झालेली पेन्शन प्रकरणे, वारसांच्या नोकरीचे प्रश्न व स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रश्नांबाबत समिती नेमण्याबाबत सदर निवेदनात मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) शासन निर्णय दिनांक ०४.०७.१९९५ नूसार (अ) तूरूगवास झालेले स्वातंत्र्य सैनिक, (आ) पकड वॉरंट निघाल्यामुळे फरारी राहिलेले स्वातंत्र्य सैनिक, (इ) भूमिगत स्वातंत्र्य सैनिक आणि (ई) गोवा मुक्ती संग्रामात सहभागी झालेले स्वातंत्र्य सैनिक यांनी निवृत्तीवेतन मिळण्यासाठी कोणते पुरावे सादर करणे आवश्यक आहे, हे विहित करण्यात आलेले आहे. सदर निकषाची पुर्तता ज्या प्रकरणामध्ये होत नाही, ती प्रकरणे स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीने नामंजूर केलेली आहेत.

स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांना शासकीय सेवेतील गट 'क' व 'ड' च्या पदावरील नियुक्तीसाठी पसंतीक्रम व वयोमर्यादेत सवलत दिलेली आहे.

त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रश्नाबाबत वेगळी समिती नेमण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे शहरातील जीर्ण झालेल्या इमारतींबाबत

**(३९) ५५६१४ (२९-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरात जीर्ण झालेल्या व कोसळण्याच्या स्थितीत असलेल्या शंभरपेक्षा जास्त इमारती असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीमधील राहणाऱ्या नागरिकांचे वास्तव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीमधील नागरीकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) यासंदर्भात महानगरपालिकेतर्फे प्राथमिक स्वरुपाचा सर्व्हे मे, २०१६ अखेर करण्यात आलेला आहे. यामध्ये प्राथमिक अहवालानुसार ८५ इमारती धोकादायक स्थितीत आढळलेल्या आहेत. याबाबत संबंधित इमारत मालकांना इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत महानगरपालिकेतर्फे लेखी पत्र देण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे बापकळ (ता.जि.जालना) येथील दलित महिलेस मारहाण करण्यात आल्याबाबत**

**(४०) ५६९४५ (२३-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बापकळ (ता.जि.जालना) येथील सार्वजनिक नळावर पाणी भरण्यासाठी गेलेल्या दलित महिलेस सवर्णांनी जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण केल्याची घटना दिनांक ३१ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :**(१) होय.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीनी दिलेल्या तक्रारीवरुन पो.स्टे.मौजपुरी (जि.जालना) येथे गु.र.नं.५७/२०१६ कलम-१४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ भादंवि सह कलम ३(१)(११) अ.जा.ज./अ.प्र.का. १९८९ अन्वये व कलम १३५ म.पो.का. प्रमाणे दि. २५.५.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी, परतुर हे पुढिल तपास करत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुने नाशिक परिसरातील डॉ. झाकीर हुसेन रुग्णालयाची अत्यंत दुरावस्था झाल्याबाबत**

**(४१) ५७९४४ (२६-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुने नाशिक परिसरातील डॉ. झाकीर हुसेन रुग्णालयाची अत्यंत दुरावस्था झाली असून रुग्णालयाच्या दुरूस्तीकरिता स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी मागणी करून देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रूग्णालयाची दुरूस्ती करण्यासांदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयाच्या दुरुस्तीची कामे नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहेत. तसेच सदर रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने मागणी केल्यानुसार वेळोवेळी आवश्यक ती दुरुस्तीची तथा सुविधा पुरविण्याची कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येतात.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर सुधार प्रन्यासच्या तरोडी येथील जमीनीबाबत**

**(४२) ५८०४६ (२९-०८-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यासची तरोडी येथे जमीन असुन या जमीनीचे नंदनवन स्थित कुंभारटोली येथे जिजामाता हाऊसिंग सोसायटीचे संचालक यांनी बनावट दस्तावेज तयार करुन अनेक लोकांना भुखंड विकले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुखंडाच्या नोंदणी रजिस्टारच्या संगनमताने करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) मौजा तरोडी (खुर्द) येथील ख.क्र.४६/२ (जुना) नवीन ख.क्र.१५, क्षेत्रफळ ८.२५ एकर ही जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीची असून, या जागेची रितसर मोजणी दिनांक ११/८/२०१५ रोजी करण्यात आलेली आहे. त्यावेळी श्री.अशोक धापोडकर व श्री.राजू लिलवा कनोजीया यांनी नागपूर सुधार प्रन्यासची जागा गावठान दर्शवून, जिजामात लॅन्ड डेव्हलपर्स नावाने अनधिकृत अभिन्यास तयार करुन, त्यावर भुखंडाची आखणी करुन त्यातील भुखंडधारकांना अवैधरित्या भुखंडाची विक्री केल्याचे निदर्शनास आलेवरुन, नागपूर सुधार प्रन्यासने संबंधितांविरुध्द नंदनवन पोलीस स्टेशन नागपूर येथे तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलीस विभागाने प्रथम खबरी अहवाल क्र.३७९ दिनांक १/१०/२०१५ अन्वये गुनहा दाखल केलेला आहे.

उक्त अभिन्यासातील २७६ भूखंडापैकी ६६ भूखंडावर अवैध बांधकाम झालेले असून, या ६६ भूखंडावर अवैध बाधकाम करणा-या भूखंडधाराकांना दिनांक १९/९/२०१५ अन्वये नागपूर सुधार प्रन्यास अनिनियम १९३६ चे कलम ७ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली आहे.

असे सभापती, नागपुर सुधार प्रन्यास यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

**राज्यातील शहरी भागातील पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन तातडीच्या पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी असलेली लोकवर्गणीची अट शिथील करण्याबाबत**

**(४३) ५८३३४ (२६-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी भागातील पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन तातडीच्या पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी असलेली लोकवर्गणीची अट शासनाने शिथील केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "अ", "ब" व "क" वर्ग महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रासाठी किती टक्के लोकवर्गणी शिथील करण्यात आली आहे,

(३) तसेच, शहरी भागातील किती व कोणकोणत्या पाणी पुरवठा योजना नव्याने कार्यान्वीत करण्यात आल्या आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यास नगर पंचायत व प्रशासक नियुक्त करण्याबाबत**

**(४४) ५९११७ (२६-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यास नगर पंचायत व प्रशासक नियुक्त करण्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना माहे नोव्हेंबर, २०१५ रोजी दिल्यानंतर मा.मुख्यमंत्री यांच्याकडून जिल्हाधिकारी नागपूर यांना पत्राद्वारे त्वरीत निर्णय घेण्याबाबतच्या सुचना दिल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) राज्य निवडणुक आयोगाचे स्थायी निर्देशानुसार नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी ग्रामपंचायतीचे नगर पंचायतीत रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**चांदूर बाजार नगरपरिषद हद्दीतील नारायण नगर येथील सर्वे न १ आणि २/२ मध्ये असलेल्या खुल्या जागेतील १० टक्के जागा श्री शिवाजी महाराज बहुउद्देषीय सामाजिक संस्था यांना देण्याबाबत**

**(४५) ६०८०५ (२९-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर बाजार नगरपरिषद हद्दीतील नारायण नगर येथील सर्वे नं. १ आणि २/२ मध्ये असलेल्या खुल्या जागेतील १० टक्के जागा श्री.शिवाजी महाराज बहुउद्देशीय सामाजिक संस्था चांदूर बाजार यांना त्रुटींची पूर्तता करून देण्याबाबत स्थानिक विधानसभा सदस्य अचलपूर यांनी नगरविकास विभाग यांना दिनांक २३ मे, २०१६ रोजी लेखी पत्र लिहून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) प्रश्न भाग १ मध्ये नमुद विनंतीच्या अनुषंगाने आवश्यक आदेश दिनांक १७/०६/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

---

**जालना जिल्हयातील जाफ्राबाद, बदनापूर व मंठा या नवनिर्मित नगरपंचायतींवर कायमस्वरूपी मुख्याधिकारी नियुक्त करण्याबाबत**

**(४६) ६१३७४ (२९-०८-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील जाफ्राबाद, बदनापूर व मंठा या नवनिर्मित नगर पंचायतींवर प्रभारी मुख्याधिकारी नियुक्त करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवनिर्मित नगर पंचायतींचा कारभार गतीमान व्हावा याकरीता कायमस्वरूपी मुख्याधिकारी देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जालना जिल्हयातील सर्व नवनिर्मित नगरपंचायतीवर कायमस्वरूपी मुख्याधिकारी नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) जालना जिल्हयातील जाफ्राबाद, बदनापूर मंठा व घनसावंगी या नवनिर्मित नगरपंचायतीपैकी जाफ्राबाद, बदनापूर व मंठा या

नवनिर्मित नगरपंचायतींच्या मुख्याधिकारी पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन पुरस्कृत सरळसेवा प्रविष्ट मुख्याधिकारी, गट-ब संवर्गातील परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थींना दिनांक १३.०८.२०१६ च्या शासन आदेशान्वये On Field Trainnig स्वरुपात नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत

---

**गडचिरोली नगरपरिषद अंतर्गत असणाऱ्या झोपडपट्टयांना घरांचे स्थायी पट्टे देणेबाबत**

**(४७) ६२०२६ (२९-०८-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली नगर परिषदेमध्ये मागील २५ वर्षापासून रामनगर, इंदिरानगर, गोकुळनगर, विवेकानंद नगर इत्यादी झोपडपट्ट्या असुन या झोपडपट्टयांना रस्ते, वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य यासारख्या सर्व सोयी सुविधा मागील अनेक वर्षापासून नगर परिषदेमार्फत पुरविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना अजूनपर्यंत कायमस्वरूपी घरांचे पट्टे देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१६) :**(१) होय.

(२) सदर क्षेत्र झुडपी जंगल प्रकारात येत असल्याने व सदर क्षेत्रास १९८० चा वन अधिनियम लागू होत असल्यामुळे पट्टे देण्यात आलेले नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मँगनिज खणन उपक्रमाच्या माध्यमातून नागपूर रामटेक माईन्सचे प्रक्रिया उद्योग उभारणेबाबत**

**(४८) ६३४११ (२९-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मँगनिज खाण उपक्रमाच्या माध्यमातून नागपूर रामटेक माईन्सचे प्रक्रिया उद्योग उभारणेबाबत केंद्र शासन व राज्य शासनाचे धोरण असल्याचे माहे जून, २०१६ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उद्योगाच्या माध्यमातून मँगनिज प्रक्रिया उद्योगामार्फत बेरोजगार युवकांना संधी देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प कधी पर्यंत कार्यान्वीत करण्यात येणार आहे तसेच प्रकल्पाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१७-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील सिंहस्थ पर्वणीकाळात शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना पुरवण्यात आलेल्या आहार पुरवठयाच्या देयकाबाबत**

**(४९) ६३९६० (२९-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिंहस्थ पर्वणीकाळात अंतर्गत व बाह्य वाहनतळावर नियुक्त केलेल्या विविध शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पुरवण्यात आलेल्या आहार पुरवठयाच्या बिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर कपात करण्यात आल्याचे आरोप महिला बचतगटांकडून करण्यात आले असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन महिला बचतगटांची देयके मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कालावधीत जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत तसेच, नाशिक महानगरपालिकेमार्फत तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या बाह्य व अंतर्गत वाहनतळावरील महिला बचत गटांच्या आहार पुरवठा प्रित्यर्थ अदा करावयाची कोणतीही देयके प्रलंबित नाहीत.
(२) प्रत्येक महिला बचत गटास मंजूर दरानुसार तसेच पुर्ण रकमेची देयके अदा करण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव शहरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याबाबत**

**(५०) ६४४०२ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरात भटक्या कुत्र्यांनी मागील ५ महिन्यात ८०० ते ९०० नागरिकांना चावा घेतल्याचे माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानूसार भटक्या कुत्र्यांना मारता येत नसल्यामुळे राज्यात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढुन रॅबीजच्या रुग्णांत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगाव महानगरपालिकेने १५ हजार कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यासाठी केवळ १ लाख रुपयांची तरतुद केल्यामुळे निविदेला प्रतिसाद मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भटक्या कुत्र्यांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

जळगाव शहरात भटक्या कुत्र्यांनी ४०० ते ५०० नागरिकांना चावा घेतल्याच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत.
(२) होय.
(३) होय.
(४) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये मोकाट कुत्रे यांचे निर्बीजीकरण करणे या कामासाठी रु. १० लक्ष रक्कमेची तरतूद करण्यात आलेली असून, त्याअनुषंगाने ई-निविदा प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.